**अर्ज (क.नु.भ.) क्र. सी–१/२०२२**
**निशाणी यु–८**
**पान क्र.८, परिच्छेद क्र.१६.**

**<u>साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास –वि.प. तर्फे विधीज्ञ श्री. पी.एच.जोशी</u>**

१६. मी आदीत्य हॉस्पीटलच्या डॉक्टरांना मालकाचे नाव कृष्णा भिमराव राठोड असे सांगितले, त्यांनी माझ्या उपचाराच्या पेपरमध्ये भिमराव कृष्णा राठोड असे का लिहिले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी डॉक्टरांना मालकाचे नाव भिमराव कृष्णा राठोड असे सांगितले होते व त्यामुळेच त्यांनी तसे लिहिले आहे. माझ्याकडे इ.एस.आय. चा दाखला नाही. माझ्याकडे हजेरी मस्टर व इतर तत्सम स्वरुपाचा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी औद्योगिक वसाहतीमध्ये वेगवेगळया ठिकाणी झाडलोट करण्याचे काम करणेसाठी जात होते.

१७. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्या दिवशी राठोड यांचेकडे काम करणेसाठी जात होते त्यादिवशी मला मोबदल्यापोटी रु.७५/– एवढे वेतन मिळत होते. हे म्हणणे खरे नाही की, कारखान्यामध्ये काम करत असताना माझे मशिनकडे जाण्याचे काहीही काम नव्हते.

१८. कृष्णा भिमराव राठोड हा राजकीय पक्षाचे काम करतो याविषयी मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, कृष्णा भिमराव राठोड यांनी माझ्यावर झालेल्या उपचाराची रक्कम देवून मदत केली. हे म्हणणे खरे नाही की, मी श्री. राठोड यांना मला शासनाकडून पैसे मिळाल्यावर तुम्ही उपचारासाठी दिलेली रक्कम परत करते असेही सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा दुर्गामाता पॅकेजींग या कारखान्यात

घडला नव्हता. मला लिहिता–वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, मी वि.प. यांचेकडे लिखाणाचे काम करत असल्याचे खोटे सांगत आहे. माझे शिक्षण इयत्ता ९ वी पर्यत झाले आहे. मी कारखान्यामध्ये कर्मचाऱ्यांची नावे लिहिण्याचे काम करत होते. कर्मचाऱ्यांच्या यादीमध्ये माझे नाव येत नव्हते, साक्षीदार स्वतः सांगते की, मला रोख स्वरुपात वेतन दिले जात होते त्यामुळे माझे नाव त्यात येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी राठोड यांना दवाखान्यात उपचाराकामी दिलेली रक्कम परत दयावी लागू नये म्हणून सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे व पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे. मी आणखीन साक्षीदारांचा पुरावा दाखल करणार आहे किंवा कसे हे मला आता सांगता येणार नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

**सही/–**

**सांगली.**

**(सैफुद्दीन बा.शेख)**
**आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई आणि**
**न्यायाधीश, कामगार न्यायालय, सांगली.**

**दि. २७/०२/२०२४**